४.४५
२-४-२०२४

# उल्हासनगर महानगरपालिका

## माहिती व जनसंपर्क विभाग

दुरध्वनी क्र. ०२५१-२७२०११६, विस्तार क्र.२२५ proumc321@gmail.com

दिनांक : ०२/०४/२०२४

# प्रेसनोट

माझी वसुंधरा अभियान ४.० अंतर्गत पर्यावरण संवर्धन व संरक्षण याचे महत्व शालेय स्तरावर बाल वयात विद्यार्थ्यांमध्ये प्रत्यक्ष कृतीद्वारे बिंबवण्यासाठी शासन निर्णयाद्वारे राज्यातील माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमध्ये "पर्यावरण सेवा योजना" अंतर्गत कचरा वर्गीकरण, हवेचे प्रदुषण, ऊर्जा संवर्धन, जलसंवर्धनाचे महत्व, सणांचे पर्यावरणपुरक साजरीकरण इत्यादी विषयावर जनजागृती करणेचे निर्देश आहेत. त्याअनुषंगाने मा. प्रशासक तथा आयुक्त, श्री. अजीज शेख, अतिरिक्त आयुक्त, श्री. जमीर लेंगरेकर, उपायुक्त (पर्यावरण), डॉ. सुभाष जाधव यांच्या मागदर्शनाखाली उल्हासनगर महानगरपालिकेच्या पर्यावरण विभागामार्फत महापालिकेच्या शाळा क्र.२५,२८ व २९ मध्ये दिनांक २५/०३/२०२४ रोजी पर्यावरण सेवा योजनेअंतर्गत वरीलप्रमाणे विविध विषयांवर शालेय विद्यार्थ्यांमध्ये जनजागृतीपर कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. सदर कार्यशाळेदरम्यान पर्यावरण संवर्धनावर आधारीत व्हिडीओ विद्यार्थ्यांना दाखविण्यात आले. यावेळी सदर शाळांचे मुख्याध्यापक, शिक्षक, विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते.

पर्यावरण सेवा योजनेअंतर्गत शालेय विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणाविषयी जनजागृती व्हावी याकरीता हरीत शपथ देखील घेण्यात आली. यावेळेस पर्यावरण विभागाच्या विभागप्रमुख सो. विशाखा सावंत, लिपीक श्री. सयाजी घाटविसावे हेदेखील उपस्थित होते.

(छाया प्रकाश डोंगळे)
जनसंपर्क अधिकारी
उल्हासनगर महानगरपालिका

प्रत — माहितीस्तव.
मा. प्रशासक तथा आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका
प्रत — योग्य त्या कार्यवाहिस्तव रवाना.

१) पत्रकार कक्ष, उल्हासनगर महानगरपालिका
२) सिस्टीम ॲनलिस्ट, माहिती तंत्रज्ञान विभाग, उल्हासनगर महानगरपालिका
   - सदरची प्रेस नोट उल्हासनगर महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावी.